■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. ८ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक २७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# 'ऑपरेशन सिंदूर' जय हो!



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: केले मॉनिटरिंग

॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

## ९ तळ नष्ट । २५ मिनीटात ७० दहशतवादी ठार

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

पहलगाममधील २६ हिंदूंच्या टार्गेट किलींगनंतर भारताने मंगळवारी मध्यरात्रीनंतर ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे ९ तळ नष्ट केले. तसेच रात्री १.०५ ते १.३० वाजेच्या दरम्यान अवघ्या २५ मिनीटात ७० दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री, कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ऑपरेशन सिंदूरची सविस्तर माहिती दिली.

भारतीय वायुसेना, नौदल आणि लष्कराने एकत्रितपणे ऑपरेशन सिंदूर यशस्वी केले. राफेल विमानांनी स्काल्प आणि हॅमर मिसाईल्सचा वापर करत पाकिस्तानात ४ ठिकाणी आणि पीओकेमध्ये ५ असा एकूण ९ ठिकाणी हल्ला केला. हे हल्ले भारतीय हद्दीतूनच करण्यात आले. त्यामुळे पाकिस्तानी लष्करी ठिकाणांना टार्गेट केले नाही. हा सर्जिकल स्ट्राईक योग्य वेळ, मर्यादित, अचूक आणि गैर–आक्रमक असल्याचे सांगितले.

या हलल्यांचे नियोजन, गुप्तचर माहिती, सॅटेलाइट फोटो आणि संनाद यंत्रणेवर आधारित होते. भारतीय सैन्याने अवघ्या २५ मिनीटात ९ दहशतवादी तळांवर हल्ला चढवला. यामध्ये बहावलपूर येथील जैश–ए–मोहम्मदचे मुख्यालय, मार्कझ सुभान अल्लाह, मुरिदके येथील लष्कर–ए–तय्यबाचा मार्कझ तैबा, सियालकोट येथील मेहमूना जिया (हिजबुल मुजाहिदीन), तेहरा कलन येथील सर्जल (जैश), कोटली येथील मार्कझ अब्बास आणि मस्कर रहील शाहिद, मुजफ्फराबाद येथील शवई नाला आणि सय्यदना बिलाल तळ, तसेच बरनाला येथील मार्कझ अहले हदीस यांचा समावेश होता.

भारताच्या हल्ल्यानंतर पाकिस्तानने पुंछ आणि राजौरी येथील सीमावर्ती भारतीय गावांवर गोळीबार केला. त्यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला, तर ४४ जण जखमी झाले आहेत. दरम्यान, पाकिस्तानने नीलम–झेलम प्रकल्प आणि नागरी ठिकाणांवर हल्ले झाल्याचा खोटा दावा केला. पाकिस्तानचा दावा भारताच्या पीआयबी फॅक्टचेकने खोडून काढला. सोशल मीडियावर व्हायरल व्हिडिओ आणि पीओकेतील रहिवाशांनी शेअर केलेल्या फुटेजमुळे पाकिस्तानच्या क्रूरतेचा पुरावा समोर आला.

भारताने अमेरिका, ब्रिटन, सौदी अरेबिया, यूएई आणि रशियाला ऑपरेशन सिंदूरसंदर्भात माहिती दिली. दहशतवाद्यांच्या विरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला पाठिंबा मिळालाय. दोन्ही देशांनी शांतता बाळगावी, असे आवाहन यूएनकडून करण्यात आलेय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रात्रभर ऑपरेशन सिंदूरचे निरीक्षण केले, तर एनएसए अजित डोवाल यांनी अमेरिकेच्या सुरक्षा सल्लागार मार्को रुबियो यांच्याशी चर्चा केली.



## नरेंद्र मोदी स्टेडियम बॉम्बने उडवण्याची धमकी

**● अहमदाबाद । वीरभूमी–**

मध्यरात्री पाकिस्तानवर एअर स्ट्राईक करण्यात आला, या एअर स्ट्राईकमध्ये पीओके आणि पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. पाकिस्तानमधील चार तर पीओकेमधील पाच दहशतवादी अड्डे भारताने उद्ध्वस्त केले आहेत, या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला आहे. याचदरम्यान गुजरातमधील नरेंद्र मोदी स्टेडियमला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. गुजरात क्रिकेट असोसिएशनला धमकीचा मेल प्राप्त झाला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार हा धमकीचा मेल पाकिस्तानातून करण्यात आला आहे, या मेलमध्ये स्टेडियमला बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. नरेंद्र मोदी स्टेडियम हे देशातील सर्वात मोठे स्टेडियम आहे, दरम्यान धमकीचा मेल आल्यानंतर आता पोलिस अलर्ट मोडमध्ये आले असून, पोलिसांकडून धमकीच्या ई–मेलबाबत चौकशी सुरू करण्यात आली आहे.

## कुटुंबाऐवजी मी गेलो असतो तर बरं झाले असते; जैशच्या मसूद अझहरची प्रतिक्रिया

**● लाहौर । वीरभूमी–**

कंदहार विमान अपहरणाचा सूत्रधार आणि जैश–ए–मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा प्रमुख मौलाना मसूद अझहर याने म्हटले की, बहावलपूरमधील भारतीय हल्ल्यात त्याच्या कुटुंबातील १० सदस्य आणि ४ सहकारी मारले गेले आहेत. एका वृत्तानुसार मसूद अझहरने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की मारल्या गेलेल्यांमध्ये त्याची मोठी बहीण आणि तिचा पती, मसूद अझहरचा पुतण्या आणि त्याची पत्नी, मसूदची भाची आणि तिची ५ मुले यांचा समावेश आहे. दहशतवादी मसूदचे तीन जवळचे सहकारीही मारले गेल्याचे निवेदनात म्हटले आहे. याशिवाय, एका सहका–याच्या आईचेही निधन झाले आहे. भारताने बहावलपूरमध्ये केलेल्या हवाई हल्ल्यात जैशचा मरकज सुभान अल्लाह तळ उद्ध्वस्त केला आहे. भारताने बहावलपूरमध्ये केलेल्या हवाई हल्ल्यात जैशचा मरकज सुभान अल्लाह तळ उद्ध्वस्त केला आहे. संसदेवरील हल्ल्याव्यतिरिक्त, अझहर पठाणकोट–पुलवामा हल्ल्याचाही मास्टरमाइंड आहे. अझहर भारतात फक्त एकच नाही तर अनेक दहशतवादी हल्ल्यांसाठी जबाबदार आहे. संसदेवरील हल्ल्याव्यतिरिक्त, मसूद हा २०१६ च्या पठाणकोट हल्ल्याचाही मास्टरमाइंड आहे. या प्रकरणातील दिल्ली पोलिसांच्या आरोपपत्रानुसार, मसूदने भारतावर हल्ले करण्यासाठी जैश–ए–मोहम्मदच्या कार्यकर्त्यांचा वापर केला होता. त्याने २००५ मध्ये अयोध्येतील रामजन्मभूमीवर आणि २०१९ मध्ये पुलवामा येथे सीआरपीएफ जवानांवर हल्ला केला होता. याशिवाय, २०१६ मध्ये उरी हल्ला आणि अफगाणिस्तानातील मजार–ए–शरीफ येथील भारतीय वाणिज्य दूतावासावरील हल्ल्यासाठीही मसूद जबाबदार आहे. अझहर हा अल–कायदा प्रमुख ओसामा बिन लादेन आणि तालिबान संस्थापक मुल्ला उमर यांचा जवळचा मित्र होता.



## पाक पिसाळला, शस्त्रसंधीचे उल्लंघन करीत तोफा डागल्या; ७ भारतीयांचा मृत्यू

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

भारतात घुसखोरी करून पहलगाममध्ये पर्यटकांचे प्राण घेणाऱ्या दहशतवाद्यांवर भारताने जबरदस्त प्रहार केला. दहशतवाद्यांच्या आश्रयाची ठिकाणे असलेले तब्बल ९ ठिकाणे भारतीय लष्कराने उद्ध्वस्त केली. भारतीय लष्कराने मध्यरात्री केलेल्या या कारवाईनंतर पाकिस्तानचा थयथयाट सुरू झाला आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानी लष्कराने शस्त्रसंधीचे उल्लंघन करत भारतीय हद्दीतील गावांना लक्ष्य करत अंदाधूंद गोळीबार केला. यात तब्बल ७ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

२२ एप्रिल रोजी पहलगाममधील बैसरन पठारावर झालेल्या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावले उचलली आहेत. भारताने पाणी, व्यापार आणि टपाल सेवा बंद केली आहे. त्यामुळे पाकिस्तानची मोठी कोंडी झाली आहे. पहलगाम हल्ल्यापासूनच पाकिस्तानच्या लष्कराकडून सातत्याने शस्त्रसंधीचे उल्लंघन करत गोळीबार केला जात आहे.

जम्मू आणि काश्मिरातील आंतरराष्ट्रीय सीमेलगत असलेल्या गावांवर पाकिस्तानी लष्करांकडून उखळी तोफा डागण्यात आल्या. सीमेलगत असलेल्या गावांना पाकिस्तानी लष्कराने लक्ष्य केले. घरांवर गोळीबार करण्यात आला. उखळी तोफा डागण्यात आल्या. पाकिस्तानकडून अचानक करण्यात आलेल्या या गोळीबारामध्ये ७ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. यात एक महिला आणि दोन लहान मुलांचा समावेश आहे, अशी माहिती अधिका–यांनी दिली. जम्मूतील पुंछ जिल्ह्यात ही घटना घडली आहे. पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या गोळीबारात २५ नागरिक जखमी झाले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

### भारतीय लष्कराकडून प्रत्युत्तर

पाकिस्तानी लष्कराकडून सातत्याने भारतीय हद्दीतील चौक्यांना आणि गावांना लक्ष्य केले जात आहे. पाकिस्तानने शस्त्रसंधीचे पालन करावे, असे भारतीय लष्कराकडून पाकिस्तानला सांगण्यात आले आहे. यासंदर्भात एक लष्करी पातळीवर बैठकही झाली आहे. पण, पाकिस्तानकडून शस्त्रसंधी न पाळता गोळीबार सुरूच आहे. बुधवारी पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या गोळीबाराला भारतीय लष्करानेही जशास तसे प्रत्युत्तर दिले.

## केंद्र सरकारने बोलावली सर्वपक्षीय बैठक

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

पाकिस्तानमध्ये अतिरेक्यांच्या विरोधात केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' नंतर केंद्र सरकारने गुरुवार ८ मे रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत सर्वपक्षीय प्रतिनिधींनी 'ऑपरेशन सिंदूर'ची थोडक्यात माहिती दिली जाईल. तसेच आता निर्माण झालेल्या परिस्थितीविषयी सांगितले जाईल. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारत हा विषय कसा हाताळत आहे त्याची कल्पना दिली जाईल. भारतीय सैन्य दले येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले जाईल. भारताने 'ऑपरेशन सिंदूर' का केले आणि त्यातून काय साध्य झाले याबाबतही सर्वपक्षीय प्रतिनिधींना सांगितले जाणार आहे.

## पाकविरोधात आणखी मोठी कारवाई होणार?

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

पाकिस्तान समर्थिक दहशतवाद्यांनी केलेल्या पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, भारतीय लष्कराने मध्यरात्री पाकिस्तानात ९ ठिकाणी हवाई हल्ले केले. या हल्ल्यात सूमारे १०० दहशतवादी ठार झाल्याची माहिती आहे.

या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बुधवार दि. ७ मे रोजी जम्मू–काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनाही सीमावर्ती भागात राहणा–या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याच्या सूचना केल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीत सीमावर्ती भागात राहणाऱ्या लोकांना आश्रय देण्यासाठी बंकर तयार ठेवण्यासही त्यांनी संबंधित अधिका–यांना सांगितले आहे. तसेच, सर्व निमलष्करी दलांच्या प्रमुखांना रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांना परत बोलावण्याचे निर्देशही दिले आहेत. गृहमंत्र्यांनी देशातील अंतर्गत सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला असून सर्व उच्च सुरक्षा अधिकाऱ्यांना सतर्क राहण्यास आणि कडक नजर ठेवण्यासही सांगितले आहे.

गृहमंत्र्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' हे पहलगाममधील निष्पाप लोकांच्या क्रूर हत्येला भारताने दिलेला प्रतिसाद असल्याचे वर्णन केले. त्यांनी म्हटले की, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार भारत आणि देशातील नागरिकांवरील कोणत्याही हल्ल्याला योग्य उत्तर देण्यासाठी कटिबद्ध आणि दहशतवादाचे उच्चाटन करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर काही तासांतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक घेतली. याशिवाय ते सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची बैठकही घेणार आहेत. यात सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला जाईल.

## देशातील २५९ ठिकाणी 'मॉक ड्रिल' यशस्वी

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने विविध मार्गाने पाकिस्तानच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली असून त्याचाच एक भाग म्हणून गृह मंत्रालयाने बुधवारी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना 'मॉक ड्रिल' करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे देशभरात २५९ ठिकाणी 'मॉक ड्रिल' अर्थात युद्ध सराव करण्यात आला असून यामध्ये महाराष्ट्रातील १७ ठिकाणांचा समावेश होतो.

महाराष्ट्रातील मुंबई, उरण, तारापूर, ठाणे, पुणे, नाशिक, रोहा, नागोठणे, मनमाड, सिन्नर, थळ, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, भुसावळ, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथे युद्ध सराव (मॉक ड्रिल) करण्यात आला आहे. देशाच्या सीमेवर असलेल्या राजस्थान, पंजाब, जम्मू–काश्मीर, पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातील राज्यांच्या अनेक शहरांत युद्धसराव केल्या गेला आहे. महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी 'मॉक ड्रिल' यशस्वीपणे पार पडला आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत–पाकिस्तानमध्ये संबंध ताणले असून केंद्रीय गृह मंत्रालयाने काही राज्यांना स्वसंरक्षणासाठी सराव करण्याचे निर्देश दिले होते. देशभरातील एकूण २५९ ठिकाणी ७ मे रोजी युद्धसराव केला जाणार असल्याची माहिती दोन दिवसांपूर्वी जाहीर करण्यात आली होती. या सरावातून हवाई हल्ला झाल्यास इशारा देणा–या भोंग्यांची चाचणी तसेच अशा स्थितीत नागरिकांनी स्वत:चा बचाव कसा करावा, याबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. याशिवाय 'क्रॅश ब्लॅकआऊट' (मोठ्या प्रदेशात एकाच वेळी अंधार करणे), महत्त्वाच्या आस्थापनांच्या संरक्षणासाठी 'कॅमोफ्लॉज', तातडीने स्थलांतर करावे लागल्यास त्याची तयारी आणि सराव आदीचा समावेश करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली आहे.

संपूर्ण भारतातील २५९ ठिकाणी तीन श्रेणींमध्ये 'मॉक ड्रिल' पार पडला असून पहिल्या श्रेणीत देशभरातील संवेदनशील अशी १३ शहरे, दुस–या श्रेणीत २०१ आणि तिस–या श्रेणीत ४५ शहरे होते. महाराष्ट्रात मुंबई, उरण आणि तारापूर हे प्रथम श्रेणीत आहे. मुंबई हे भारताचे प्रमुख आर्थिक केंद्र आहे, तर उरण येथे माल वाहतूक करणारे जेएनपीटी बंदर आहे. तारापूर येथे अणुऊर्जा प्रकल्प असल्यामुळे या तीनही ठिकाणांचा समावेश संवेदनशील श्रेणीत करण्यात आला असावा, असा अंदाज आहे.



# SPOT NEWS

## 'ऑपरेशन सिंदूर'ने पहलगाम हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली : विवेक कोल्हे

● **कोपरगाव । वीरभूमी–**



पाकिस्तानातील नऊ ठिकाणांवर भारतीय संरक्षण दलांनी केलेल्या अचूक आणि प्रभावी हल्ल्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाच्या मनात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. दहशतवाद्यांना आणि त्यांच्या संरक्षकांना दिलेला हा करारा जवाब आहे, असे प्रतिपादन सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी केले. या निर्णायक कारवाईबद्दल त्यांनी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी, गृहमंत्री मा. अमित शहा आणि संरक्षणमंत्री मा. राजनाथ सिंह यांचे विशेष अभिनंदन केले. भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दल या तिन्हीही सैन्यदलांच्या समन्वयाने आणि धाडसाने देशाच्या सुरक्षेची भक्कम ढाल उभी केली असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, अलीकडेच जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप नागरिकांना त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. विवेकभैय्या कोल्हे म्हणाले, शहिदांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही. त्यांच्या त्यागातून देश अधिक बळकट होईल. देशवासीयांनी असेच एकजूट राहून राष्ट्राच्या संरक्षणासाठी सजग रहावे, असे आवाहन करताना कोल्हे यांनी सांगितले की, भारत हा लोकशाही ने भक्कम असणारा देश आहे.एकात्मतेची ताकद देशात आहे त्यामुळे या देशाकडे वाकडी नजर करणाऱ्यांना आता तितक्याच तीव्रतेने प्रत्युत्तर देईल, असा स्पष्ट संदेश या कारवाईने गेला आहे.

## हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी यांचा राजीनामा

● **श्रीरामपूर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख शैक्षणिक संस्था असलेल्या हिंद सेवा मंडळाच्या संचालक मंडळातील अंतर्गत वादाला कंटाळून संस्थेचे मानद सचिव संजय दादा जोशी यांनी तडकाफडकी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. या राजीनाम्यावर निर्णय घेण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी संचालक मंडळाची तातडीची बैठक आज गुरूवार दि. ८ रोजी सायंकाळी पाच वाजता बोलवली आहे. या बैठकीमध्ये जोशी यांच्या राजीनाम्याबाबत निर्णय होणार आहे. हिंद सेवा मंडळ सध्या शताब्दी वर्ष साजरा करीत असून संस्थेच्या जिल्ह्यात अहिल्यानगर, श्रीरामपूर, मिरजगाव, अकोले आदी ठिकाणी शैक्षणिक शाखा कार्यरत आहेत. या सर्व शाखांमधून चांगला कारभार चालू असताना अहिल्यानगर शहरातील संस्थेची जागा मूळ मालकाला परत करण्याबाबत मागील काही दिवसापासून वाद सुरू आहेत. यावरून संस्थेच्या संचालक मंडळात दोन गट पडले आहेत. विद्यमान संचालक मंडळाने बहुमताने सदरची जागा मूळ मालकाला परत करण्याचा निर्णय घेतला आहे. तसा ठराव एकमताने संस्थेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेला आहे परंतू याला संचालक मंडळातील ब्रिजलाल सारडा व इतर काही सदस्यांचा विरोध आहे. सदर जागेच्या व्यवहारापोटी संस्थेला पाच कोटी रुपये देखील प्राप्त झाले आहेत. या रकमेतून संस्थेच्या इमारती उभारण्याचा संस्थेचा मानस आहे. यावरून ब्रिजलाल सारडा व अजित बोरा या दोन विद्यमान संचालकांमध्ये ३ मे रोजी झालेल्या बैठकीत मोठी खडाजंगी होऊन हमरातुमरी झाली होती. तसेच एकमेकाचा बाप दाखवण्यापर्यंत मजल गेली. वाद वाढत गेल्याने मानद सचिव जोशी यांनी ती सभा तहकूब केली. परंतू त्याची जिल्ह्यात मोठ्या प्रमणावर चर्चा झाल्याने शेवटी कंटाळून संजय जोशी यांनी आपल्या मानद सचिव पदाचा राजीनामा संस्थेचे अध्यक्षांकडे पाठवून दिला. त्यामुळे संस्थेतील मतभेद उघड झाल्याने जिल्ह्याच्या शैक्षणिक वर्तुळात तो एक चर्चेचा विषय झाला आहे. मानद सचिव संजय जोशी यांचा राजीनामा मंजूर झाला तर त्याचा संस्थेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होणार आहे. संस्थेची निवडणूक बिनविरोध करण्यामध्ये संजय जोशी यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याचबरोबर मोठी परंपरा असलेल्या या शैक्षणिक संस्थेच्या संचालक मंडळातील सर्व ज्येष्ठांचा मान राखत सर्वांना सोबत घेऊन जाण्याचे काम श्री. जोशी यांनी केले आहे.

## राजकीय नेत्यांसह कुकडी प्रकल्पाने

# श्रीगोंदा तालुक्यातील लाभधारक शेतकऱ्यांची केली दैनावस्था

### तालुक्यातील फळबागा, उन्हाळी पिके मोजताहेत शेवटच्या घटका

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा तालुक्याच्या शेतीच्या समृद्धीचे स्वप्न दाखवणारा कुकडी प्रकल्प गेल्या काही वर्षांपासून लाभधारक शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरला आहे. अपुरे पाणीवाटप, रखडलेली कामे आणि राजकीय नेत्यांचे दुर्लक्ष यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक आणि मानसिक दैनावस्था झाली आहे. येणारे १६ मे नंतरचे अखेरचे आवर्तन फक्त पिण्याचे असणार अशी शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

कुकडी प्रकल्पाच्या नावाखाली मोठमोठ्या घोषणा करणारे नेते प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस पावले उचलताना दिसत नाहीत, असा संताप तालुक्यातील शेतकरी व्यक्त करत आहेत. कुकडी प्रकल्प हा श्रीगोंदा तालुक्यासाठी वरदान ठरणार होता. घोड आणि कुकडी नद्यांच्या पाण्यावर आधारित या प्रकल्पातून तालुक्यातील शेकडो गावांना सिंचन सुविधा उपलब्ध होणार होती. मात्र, प्रकल्पाच्या अपुऱ्या नियोजनामुळे आणि कालवा दुरुस्तीच्या कामांमध्ये झालेल्या अनागोंदीमुळे अनेक शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळत नाही. लोकप्रतिनिधी व विरोधी राजकीय नेत्यांचा स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकविण्याच्या स्पर्धेत मुळ प्रश्नाला कोणीही हात घालत नाही. राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप आणि त्यांचे परस्परांविरुद्धचे आरोप-प्रत्यारोप यामुळे परिस्थिती आणखी चिघळली आहे. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत आमदार आणि इतर नेते आपापल्या मतदारसंघात जास्त पाणी मिळवण्यासाठी दबाव टाकतात, पण श्रीगोंद्याची राजकीय ताकद नेहमी काडी पहिलवानासारखीच राहिलेली आहे.



### हजारो हेक्टर फळबागा, उन्हाळी पिके पाण्याच्या प्रतीक्षेत

■ तालुक्यात लिंबू – ४०७४ हे, डाळिंब – ३७७५ हे, द्राक्षे – १३६२ हेक्टर व याचबरोबर आंबा, संत्रा, पेरू, सीताफळ, ड्रॅगन फ्रुट, बोर, चिकू, नारळ, जांभळ, चिंच, मोसंबी, अंजीर, केळी, पपई व इतर फळपिके मिळून तालुक्यात एकूण ११,६४६ हेक्टर फळबागांची लागवड उभी आहे. तर उन्हाळी भुईमूग, बाजरी, व चारा पिके मिळून ७०७७ हेक्टर क्षेत्र उभी आहेत. आज शेकडो हेक्टर फळबागा व उन्हाळी पिके पाण्याविना शेवटच्या घटका मोजत आहे. येणाऱ्या आवर्तनात फळबागांना पाणी मिळाले तरच जीवदान मिळणार आहे.

कुकडी प्रकल्पावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना पाण्याअभावी पिकांचे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. मागच्या आवर्तनात फक्त सहा दिवस पाणी तालुक्याला मिळाल्याने अनेक शेतकरी पाण्यापासून वंचित राहिले. ऊस, कापूस आणि डाळिंबासारख्या पिकांना पाण्याची गरज असताना शेतकरी हतबल झाले आहेत. अनेकांनी कर्ज काढून शेतीत गुंतवणूक केली, पण उत्पन्न न मिळाल्याने कर्जबाजारीपण वाढत आहे. कुकडी प्रकल्पाच्या कालव्यांमध्ये गळती, पाणी चोरी, अधिकाऱ्यांचा समन्वय अभाव आणि दुरुस्तीच्या कामांमध्ये भ्रष्टाचाराच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. स्थानिक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, कालव्यांची दुरुस्ती आणि देखभाल यासाठी निधी मंजूर होतो, पण तो खर्च कुठे होतो, हे कोणालाच माहीत नाही. याशिवाय, पाणीवाटपाचे नियोजन पारदर्शक नसल्याने काही गावांना जास्त पाणी मिळते, तर काही गावे उपाशी राहतात.

> १६ मे नंतर आवर्तन येण्याची शक्यता आहे. व हे अखेरचे आवर्तन असणार आहे. वरिष्ठांच्या निर्णयानंतरच पिण्याच्या पाण्याबरोबर फळबागांसाठी पाणी देण्याचा निर्णय होऊ शकतो. किती दिवसांचे आवर्तन असणार आहे हे आत्ताच सांगता येणार नाही.
>
> – **प्रवीण घोरपडे,** कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र– २, श्रीगोंदा.

### आवर्तनावेळी साहेबांसाठी सार्वजनिक वर्गणी?

■ कुकडी व घोड लाभक्षेत्रात असंख्य पाणी वापर संस्था आहेत. अनेक पाणी वापर संस्थांचे दप्तर गोणीच्या पिशवीत फिरत असते. तर बहुसंख्य पाणी वापर संस्थांना स्वतःचे कार्यालय सुद्धा नाही. या पाणी वापर संस्था वेळेत पाणी मागणी फॉर्म सुद्धा भरत नाहीत. जनजागृती तर दूरचीच. पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी व तहसीलदारांचे आदेश असूनही ग्रामपंचायत पदाधिकारी पिण्याच्या पाण्याचे उद्धव भरून घेण्यासाठी साहेबांचे मिटवावे लागेल असे म्हणून मोठ्या प्रमाणात वर्गण्या सुरू करतात तरीही कुणालाच पुरेसे पाणी मिळत नाही, हे विशेष.

## भारत स्वतःहून कोणाची छेडखानी करत नाही, मात्र केलं तर सोडत नाही : अण्णा हजारे

● **पारनेर । वीरभूमी–**



भारताचे नंदनवन काश्मिरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी पाक दहशतवादी यांनी भ्याड हल्ला करून २७ निष्पाप पर्यटकांची हत्या केली होती. या पार्श्वभूमीवर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानमध्ये घुसून हल्ला चढवला. यावेळी पाक व्याप्त काश्मीर व पाकिस्तानातील ९ दहशतवादी केंद्रांवर हल्ला चढवण्यात आला. यावर आपली प्रतिक्रिया देताना अण्णा हजारे यांनी भारतीय सैन्यां चे अभिनंदन केले.

पहलगाम येथे झालेल्य हल्ल्यामध्ये २७ निष्पाप लोकांना आपले प्राण गमवावे लागले होते. भारताकडून काही दिवसांच्या प्रतीक्षेनंतर थेट पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या तळावर हल्ले केले. या हल्ल्यामध्ये अनेक दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात यश आले आहे. भारताने केलेल्या एअर स्ट्राईकचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी समर्थन करताना म्हणाले लष्कराने केलेल्या कामाचं शब्दांनी कौतुक करता येत नाही इतकं सुंदर काम लष्कराने केले आहे. भारत स्वतःहून कोणाची छेडखानी करत नाही. मात्र केलं तर सोडायचं नाही. ही कारवाई योग्य असल्याचं अण्णांनी म्हटले आहे.

> भारत स्वतःहून कोणाची छेडखानी करत नाही, मात्र केलं तर सोडत नाही. भारताची कारवाई योग्य आहे. काही कारण नसताना आमचे २७ लोक मारले गेलेत. त्याचा बदला भारताने घेतला आहे. त्यामुळं कोणी काहीही बोलू शकत नाही. अशा प्रकारे कारवाई केल्याने आता कुणाची भारताकडे वाकड्या नजरेनं पाहण्याची हिंमत होणार नाही!
>
> – **अण्णा हजारे,** ज्येष्ठ समाजसेवक

## खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी राजूर येथे काविळ रुग्णांची भेट घेत तब्येतीची केली चौकशी

● **अकोले । वीरभूमी–**



अकोले तालुक्यातील राजूर गावात काविळच्या साथ रोगाने रुग्णांची संख्या वाढली आहे. दोन रुग्णांचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली. यासर्व पार्श्वभूमीवर शिर्डी लोकसभा मतदार संघाचे खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी राजूर येथील सरकारी रुग्णालयात जावून रुग्णाची तसेच मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांची भेट घेतली. रुग्णांवर सुरू असलेल्या उपचारांची माहीती वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. व रुग्णांच्या तब्येतीची चौकशी केली. जिल्हा परिषदेच्या शाळेमध्येही उपचारांच्या सुरू असलेल्या व्यवस्थेचा आढावा घेतला.

मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत करण्याचा प्रस्ताव तत्काळ सादर करण्याचे निर्देश तहसीलदार यांना दिले. तसेच खाजगी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना देखील मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत करण्यात यावी यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांचेशी देखील संपर्क साधला.

यावेळी राजूर ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच, ग्रामस्थ आणि शासकीय अधिकारी यांची एकत्रित बैठक घेवून उपाय योजनांच्या संदर्भात सर्व सूचना दिल्या.यामध्ये निष्काळजीपणा दाखविण्यार्याची चौकशी करणयाचे निर्देश जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले.

यावेळी डॉ. अजित नवले, मच्छिंद्र धुमाळ, महेश नवले सदाशिव साबळे, संतोष मूर्तडक, महेंद्र सोनवणे, नवनाथ शेटे, अमोल बोऱ्हाडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# कार्यकर्त्यांच्या नि:स्वार्थ भावनेतून अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा

### आ. आशुतोष काळे । आ. काळे यांच्या विजयासाठी कार्यकर्त्याने केलेल्या नवसाची पूर्ती

● **कोपरगाव । वीरभूमी–**

विधानसभा मतदारसंघातून २०१९ ला निवडून आलेले आमदार आशुतोष काळे पुन्हा एकदा आमदार व्हावेत यासाठी पायात चप्पल न घालण्याचा त्यांच्या कार्यकर्त्याने केलेला संकल्प आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते सोमवार (दि.०५) रोजी नवसाला पावणारे जागृत देवस्थान श्री निझर्णेश्वराला रुद्राभिषेक करुन व ५१ जोडप्यांच्या हस्ते सत्यनारायण पूजा करुन पूर्ण केला. यानिमित्ताने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नेत्यावर जीवापाड प्रेम करणारा कार्यकर्ता आणि कार्यकर्त्याला जीवापाड जपणारा नेता असा अनोखा संगम पहावयास मिळाला. यातून नवस, निष्ठा आणि नवसपूर्ती या कार्यकर्त्याच्या समर्पणाला आ. आशुतोष काळे यांची अनोखी साथ मिळत असल्याचे दिसून आले.

कोपरगाव तालुक्यातील काकडी येथील काळे गटाचे निष्ठावान कार्यकर्ते व आ.आशुतोष काळे यांच्यावर प्रेम करणारे मधुकर गुंजाळ यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आ.आशुतोष काळे पुन्हा आमदार व्हावे यासाठी पायात चप्पल न घालण्याचा शिवसंकल्प करून नवस केला होता. केलेल्या शिवसंकल्पात त्यांनी आजपर्यंत अनवाणी चालण्याबरोबरच अनुष्ठाण, ब्रह्मचर्य पालन, उपवास, शिवलीला अमृत ग्रंथाची चार पारायणे, भगवान महादेवाला चार रुद्राभिषेक आदी धार्मिक कार्यक्रम केले होते.

आ. आशुतोष काळे यांनी केलेल्या विकास कामांच्या जोरावर मतदार संघातील जनतेने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना ऐतिहासिक मताधिक्य देत तब्बल सव्वा लाखाच्या मतांनी पुन्हा आमदार केले. त्यामुळे आपण केलेला नवस पूर्ण झाल्यानंतर जवळपास आठ महिन्यांपासून अनवाणी पायांनी चालणाऱ्या मधुकर गुंजाळ यांनी श्री निझर्णेश्वराला आ. आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत सपत्नीक पत्नी सौ. संगीता गुंजाळ यांच्या समवेत रुद्राभिषेक करुन व ५१ जोडप्यांच्या हस्ते सत्यनारायण पूजा करुन पायात चप्पल परिधान केली.

यावेळी कार्यकर्त्यांचे अतूट प्रेमातून भावनिक झालेल्या वातावरणामुळे आ. आशुतोष काळे देखील भावनाविवश झाले होते. लोकशाहीत अशा प्रकारची निष्ठा दुर्मिळ मानली जाते. स्वतःच्या जीवावर उदार होऊन काम करणारे कार्यकर्ते राजकारणात फार कमी वेळा भेटतात. कार्यकर्त्यांकडून अशी निष्ठा आणि प्रेम मिळणं हे माझं भाग्य आहे व त्याचबरोबर माझ्यासाठी भावनिक आणि अभिमानाची बाब आहे. कार्यकर्त्यांची अशी नि:स्वार्थ भावना मला अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा देते.या कार्यकर्त्याच्या निष्ठेने मला भारावून टाकले असून जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या या विश्वासामुळे माझ्यावरची जबाबदारी आणखी वाढली आहे. मी माझे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी ही श्रद्धा माझ्यासाठी प्रेरणास्थान असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी यावेळी सांगितले.



# SPOT NEWS

## शिर्डीत १६ अवैध व्यावसायिकांविरूद्ध कारवाई

**● शिर्डी । वीरभूमी–**
मंगळवारी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अवैध दारू विक्रेते व अवैध जुगार चालविणाऱ्या इसमांची माहिती काढुन, पंचासमक्ष १६ वेगवेगळया ठिकाणी छापे टाकुन अवैध व्यावसायिकांविरूध्द कारवाई केली. त्यामध्ये शिर्डी पोलीस स्टेशनला महाराष्ट्र जुगारबंदी कायद्यान्वये ७ व महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ९ असे एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यात २ लाख २ हजार ३६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना जिल्ह्यामध्ये अवैध व्यावसायिकांवर कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत. या आदेशाप्रमाणे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार गणेश लोंढे, विशाल तनपुरे, रणजीत जाधव, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ अशांचे पथक तयार करून शिर्डी पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदयाची माहिती काढुन कारवाई करणेबाबत सुचना देऊन पथक रवाना केले. पथकाने गुप्त माहितीच्या आधारे वरील कारवाई करून १६ गुन्हे दाखल केले. तर २ लाख २ हजार ३६० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईचे साईभक्तांनी स्वागत केले आहे.

## राहुरीत कृषी सहाय्यकांचे धरणे आंदोलन

**● राहुरी । वीरभूमी–**
महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने आपल्या विविध मागण्यांसाठी सोमवार दि. ५ मे पासून आंदोलनास सुरुवात केली असून यासंदर्भात त्यांनी तालुकास्तरावर तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे. काल दि. ७ मे २०२५ बुधवार आंदोलनाचा तिसरा टप्पा म्हणून तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य कृषी सेवकांचा सेवक कालावधी रद्द करून सेवकांना नियमित कृषी सहाय्यक म्हणून पदावर घ्यावे, कृषी सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी असे करावे, सर्व कामकाज डिजिटल स्वरूपात होत असल्याने लॅपटॉप देण्यात यावे, त्याचप्रमाणे कृषी सहाय्यकांना ग्रामस्तरावर कामकाजासाठी कृषी मदतनीस देण्यात यावा, त्याचप्रमाणे निविष्ठा वाटप करण्यासाठी भाड्याची तरतूद करण्यात यावी व कृषी विभागाच्या आकृतीबंधास तात्काळ मंजुरी द्यावी, नैसर्गिक आपत्तीचे पंचनामे करताना कृषी महसूल आणि ग्रामविकास विभाग यांना योग्य पद्धतीने जबाबदारीचे वाटप करण्यात यावे आदी प्रमुख मागण्या कृषी सहाय्यकांच्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास १५ मे पासून सर्व योजनांचे काम पूर्णपणे बंद करण्याचा इशारा संघटनेने दिलेला आहे. याप्रसंगी राहुरी तालुक्यातील कृषी सहाय्यक संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रभात अंत्रे इतर पदाधिकारी व तालुक्यातील सर्व कृषी सहाय्यक यावेळी उपस्थित होते.

# संजीवनी पतसंस्थेच्या व्हा. चेअरमनपदी संदीप गुरुळे

### सल्लागार पदी पराग संधान व महेंद्र नाईकवाडे यांच्या निवडी

**● कोपरगाव । वीरभूमी–**
युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी सहकारी पतसंस्थेच्या व्हा. चेअरमन पदी संदीप गुरुळे यांची निवड करण्यात आली. तर सल्लागार म्हणून अमृत संजीवनचे चेअरमन पराग संधान आणि युवा उद्योजक महेंद्र नाईकवाडे यांची निवडणूक अधिकारी श्री. रहाणे यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली आहे.



संजीवनी सहकारी पतसंस्था अतिशय दूरदृष्टीने माजी मंत्री स्व.शंकरराव कोल्हे यांनी स्थापन केली होती.या पतसंस्थेच्या माध्यमातून ठेवीदार आणि खातेदार यांना तत्पर सेवा देण्यात येते. अतिशय दर्जेदार आर्थिक आलेख असणारी संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त आहे.अशा संस्थेवर वरील पदाधिकाऱ्यांची निवड झाल्याने आनंद व्यक्त होत आहे.

संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, माजी आ. स्नेहलताताई कोल्हे, सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. यावेळी चेअरमन प्रदीप नवले आणि मा. व्हा. चेअरमन राजेंद्र परजणे यांच्यासमवेत संचालक मंडळाने नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला आणि शुभेच्छा दिल्या.

प्रसंगी संचालक शिवाजीराव लहारे, भाऊसाहेब आदिक, राजेंद्र बागुल, श्रीकांत चांदगुडे, सौ.मंदाकिनी बडवर, सौ. मनिषा राऊत आदी उपस्थित होते. शेवटी आभार मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. व्ही. रोहमारे यांनी मानले.

## चापडगाव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

**● शेवगाव । वीरभूमी–**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेत शेवगाव तालुक्यातील एफ. डी. एल. शिक्षण संस्थेचे चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९६.३८ टक्के तर कला शाखेचा निकाल ४७.५४ टक्के इतका लागला आहे.



बारावी विज्ञान शाखेचे एकूण ८३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते तर कला शाखेचे एकूण १२० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी कु. कोमल प्रजापती हिने ७१.३३ टक्के गुणासह प्रथम क्रमांक मिळवला. प्राप्ती खताळ हिने ६८.८३ टक्के गुणासह द्वितीय तर सार्थक लांडगे याने ६८.६७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. तर कला शाखेमध्ये वैष्णवी गुंजाळ हीने ८५.८३ टक्के गुणासह प्रथम भाग्यश्री गोरे ७९.६३ टक्के गुणासह द्वितीय तर भक्ती काळे हीने ७१.५० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. कु. वैष्णवी गुंजाळ हीने अर्थशास्त्र या विषयात ९७ गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळवला. चापडगाव कनिष्ठ महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा याही वर्षी कायम ठेवली.

या गुणवंत विद्यार्थ्यांचे व त्यांना अध्यापन करणारे प्राध्यापकांचे कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. विद्याधरजी काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंहभैय्या काकडे, माध्यमिक शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य अरुण वावरे, पर्यवेक्षक लक्ष्मण गाडे, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद, ग्रामस्थ आदींनी अभिनंदन केले आहे.

## कोपरगावातील ग्रामपंचायतीना नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्याअंतर्गत तात्काळ पिण्याचे पाणी द्यावे

### माजी आ. स्नेहलताताई कोल्हे यांची मागणी

**● कोपरगाव । वीरभूमी–**
तालुक्यातील नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यातील लाभक्षेत्रात येणाऱ्या ग्रामपंचायतीना तातडीने पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी माजी आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी कार्यकारी अभियंता वैजापूर यांच्याकडे केली आहे.



त्यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनांत पुढे म्हटले आहे की, नांदुर मध्यमेश्वर पाटबंधारे विभागांतर्गत उन्हाळी हंगामात पिण्यांचे पाण्यांचे आरक्षणाचे प्रकटन कार्यकारी संचालक व छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत २२ एप्रिल २०२५ रोजी प्रसिध्द करण्यांत आले. वैजापुर, गंगापुर व कोपरगाव तालुक्यातील गावांना जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २८ फेब्रुवारी २०२५ रोजी कालवा सल्लागार समितीची बैठक घेण्यांत आली त्यात आकस्मीत पाणी आरक्षण आदेशान्वये मे महिन्यात नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यास उन्हाळी हंगाम पिण्यांचे पाण्यांचे आर्वतन सोडण्यांत आले.त्याप्रमाणे कोपरगांव तालुक्यातील लाभक्षेत्रातील ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्यांची मागणी केली तर संबंधीत नांदुर मध्यमेश्वर पाटबंधारे उपविभागाने पाणी देता येणार नाही म्हणून कळविले आहे.

कोपरगाव तालुक्यातील लाभक्षेत्रात येणाऱ्या ग्रामपंचायतींनी पिण्याच्या पाण्याची मागणी केल्यानंतर पाणी देता येणार नसल्याचे कळविले, हे अत्यंत दुर्दैवी आहे. यासंदर्भात सौ. कोल्हे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, या कालव्याचा लाभ फक्त वैजापूर आणि गंगापूर प्रमाणे कोपरगाव तालुक्याला देखील मिळावा. कारण कोपरगाव तालुक्यातील नागरिक देखील याच कालव्याच्या लाभक्षेत्रात राहत असताना त्यांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवणे अन्यायकारक ठरेल. हा दूजाभाव ठरू नये याचा विचार होणे गरजेचे असल्याने कोपरगावसाठी पाणी सोडण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

# दुबईत मराठी भाषिकांचा आवाज अजून बुलंद : रविंद्र चव्हाण

### युएईमध्ये राहणाऱ्या भारतीयांची सद्य:स्थिती, त्यांच्या समस्या आणि प्रश्न समजून घेऊन त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी भाजपाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य

**● मुंबई । वीरभूमी–**
व्यवसाय आणि नोकरीनिमित्त दुबईत राहणाऱ्या दीड लाख मराठी भाषिकांकरिता नुकतीच महाराष्ट्र परिषदेची स्थापना केली गेली. संयुक्त अरब अमिरातीत राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी स्थापन केलेल्या इंडियन पीपल्स फोरम या व्यापक संस्थेची अंगीकृत संस्था म्हणून ही परिषद कार्यरत राहणार आहे. भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत दुबईत महाराष्ट्र कौन्सिलची मुहूर्तमेढ रविवार, दि ४ मे रोजी रोवली गेली.




स्थापना सोहळ्याप्रसंगी बोलताना रविंद्र चव्हाण म्हणाले की महाराष्ट्र काउन्सिलच्या 'महा हेल्पलाइन' आणि 'युनायटेड महाराष्ट्र प्लॅटफॉर्म' या अत्यंत महत्त्वाच्या उपक्रमांमुळे दुबईस्थित मराठी माणसांचा आवाज अधिक बुलंद होईल आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अधिक बळ मिळेल. तसेच महाराष्ट्र सरकार आणि आयपीएफ यांच्यातील समन्वय वाढेल. तर काही कारणाने अडचणीत सापडलेल्या युएईस्थित मराठी लोकांना त्यांच्या मातृभाषेतून मदत उपलब्ध व्हावी या उद्देशाने ०५० ३६५ क्एड्झ ही 'महा हेल्पलाइन' सेवा २४ तास उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याद्वारे शासकीय आणि कायदेशीर मदतीसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे. त्याच बरोबर 'युनायटेड महाराष्ट्र' या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून युएईच्या सामाजिक क्षेत्रांत कार्यरत असलेल्या ४० संस्था एका छताखाली आल्या आहेत, यामुळे महाराष्ट्राचा एकतेचा संदेश युएईमध्ये सर्वदूर पोहोचेल असे प्रतिपादन रवींद्र चव्हाण यांनी केले.

युएईमध्ये राहणाऱ्या भारतीयांची सद्य:स्थिती, त्यांच्या समस्या आणि प्रश्न समजून घेऊन त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी भाजपाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल असे आश्वासन रवींद्र चव्हाण यांनी दिले. दुबईत मराठमोळ्या पद्धतीने आणि मोठ्या दिमाखात संपन्न झालेल्या या सोहळ्यात युएईमधील व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचे नाव उंचावणाऱ्या 'ग्लोबल महाराष्ट्रिय' व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यात आला.

इंडियन पीपल्स फोरम (IPF), याची स्थापना २०१३ मध्ये युएईमध्ये झाली होती. IPF ही युएईमधील भारतीय प्रवासी समुदायाला पाठिंबा देणारी सर्वात मोठी सामाजिक-सांस्कृतिक संघटनांपैकी एक आहे. खझ्रऋ युएई २३ विभागांमध्ये कार्य करते - ज्यामध्ये अमीरातीप्रमाणे अध्याय, १२ राज्य परिषदा, एक बिझनेस कौन्सिल आणि खास तरुणांसाठी खझ्रऋ युवा व महिलांसाठी खझ्रऋ महिला परिषद यांचा समावेश आहे. IPF युएईचे १०,००० हून अधिक सक्रिय समर्थक आहेत आणि IPF युएईने 'मरहबा मोदी २०१५' व 'अह्लान मोदी २०२४' सारख्या युएईतील काही सर्वात मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात मोलाचा वाटा उचलला आहे.

राहुल तुळपुळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित परिषदेत कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, भारताचे यूएई येथील राजदूत सतीश कुमार शिवन, IPF UAE प्रमुख श्री. जितेंद्र वैद्य आणि शेकडो भारतीय विशेषतः मराठी भाषिक उपस्थित होते. रवींद्र चव्हाण यांची युएई दौऱ्यादरम्यान भारतीय दूतावासामध्ये भारताचे Consulate General आदरणीय सतीश कुमार सिवन यांच्यासमवेत सदिच्छा भेट आणि चर्चा झाली. भारत-युएई व्यापारातील महाराष्ट्राची भूमिका, आदरणीय देवेंद्रजींच्या नेतृत्वात होऊ घातलेली महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती आणि दुबईतील व्यावसायिकांना महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या संधी अशा विविध विषयांवर चर्चा झाली. भाजपा कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले की या व्यतिरिक्त दुबईतील 'दुबई बिजनेस कम्युनिटी' आणि 'दुबई महाराष्ट्र मंडळाच्या' सदस्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक झाली. त्यात कृतार्थ राजा, सागर देसाई, सबिना खोत, दिलावर दलवाई, प्रिया जाधव, प्रसाद दातार, सचिन जोशी, अमोल वैद्य, के. जी. नारकर, राकेश पाटील, शिरीष पटवर्धन, विजेंद्र सुर्वे, राहुल तुळपुळे, रवी चिटणीस, सुहास रेगे, रोहित आगले, IPFचे राहुल तुळपुळे आणि भाजपा आमदार निरंजन डावखरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या औद्योगिक, आर्थिक व सामाजिक विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाच्या विषयांवर या बैठकीत चर्चा झाली. तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरांविषयी अनेक सकारात्मक मुद्द्यांवर विचारांची देवाण-घेवाण झाली असे रविंद्र चव्हाण यांनी नमूद केले. रवींद्र चव्हाण यांनी दौऱ्यादरम्यान इ-झड हिंदू मंदिराचे मनोभावे दर्शन घेतले आणि सायंकाळी मंदिरात होणाऱ्या गंगा आरतीमध्ये सहभाग घेतला. यावेळी BAPS हिंदू मंदिर ट्रस्टचे चेअरमन श्री. अशोक कोटेचा यांनी देवस्थानाच्या वतीने स्वागतपर सत्कार केला. याप्रसंगी BAPS हिंदू मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांशी हिंदू धर्म संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्याच्या अनुषंगाने विविध विषयांवर रविंद्र चव्हाण यांनी चर्चा केली. भारत आणि यूएई यांच्यातील मैत्री ही दोन देशांच्या सांस्कृतिक आणि आर्थिक बंधनांचा सुंदर संगम असून यात महाराष्ट्राची भूमिका विशेष आहे असे रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

## महाराष्ट्रीय उद्योजकांचा दुबईत दबदबा

■ 'गल्फ एज्युकेशन अँड फायनान्स'चे विशाल साळुंखे, अक्षय पाटील, 'ज्युपिटर ग्लोबल मार्केट'चे सागर पाटील, 'अधीरा ज्वेलर्स'चे प्रकाश पवार आणि 'नमो रिफायनरी'चे विनायक देशमुख, या सांगली जिल्ह्याच्या दुबईस्थित सुपुत्रांनी आपल्या व्यावसायिक कर्तृत्वाने दुबईमध्ये महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. तसेच दुबईतील पेशवा रेस्टॉरंट येथे 'ब्ल्यू-कॉलर कामगार सेवा कार्यक्रम' संपन्न झाला. दुबईतील मराठी ब्लू-कॉलर कामगार, घरगुती साहाय्यक, समुदाय स्वयंसेवक कामगार यांचीही मोठी संख्या असून त्यांचे दुबई आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे सहकार्य आहे. सुरेश कुंभार, अनिता जाधव आणि गणेश माने या मराठी श्रमिकांचे कर्तृत्व युएईमध्येही अधोरेखित झालं आहे.

# मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम वेळेत व उच्च दर्जाचे करा

## आ. आशुतोष काळेंच्या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना

**● कोपरगाव । वीरभूमी–** मंजूर येथील कोल्हापूर टाईप बंधारा एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल तीन वेळेस पुराच्या पाण्याने वाहून गेल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे भविष्य अंधकारमय झाले होते.त्यामुळे या बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती व्हावी अशी शेतकऱ्यांची मागणी होती व २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी या बंधाऱ्याचे शाश्वत व टिकाऊ काम करण्यासाठी निधी देणार असल्याचा शब्द मंजूर बंधाऱ्याच्या लाभधारक क्षेत्राच्या गावातील शेतकऱ्यांना दिला होता. त्या शब्दाची पूर्तता करून राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या सहकार्यातून ४१ कोटी रुपये निधी मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी दिला आहे.अशा मोठ्या कामांसाठी शासनाकडून वारंवार निधी मिळत नाही. त्यामुळे मिळालेल्या निधीतून मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम वेळेत व उच्च दर्जाचे करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना व संबंधित ठेकेदाराला दिल्या आहेत.

आ.आशुतोष काळे यांनी बुधवार (दि.०७) रोजी पाटबंधारे विभागाचे अधिकारी व मंजूर बंधाऱ्याच्या लाभक्षेत्राच्या गावातील शेतकऱ्यांच्या समवेत मंजूर बंधाऱ्याच्या सुरु असलेल्या दुरुस्तीच्या कामाची पाहणी केली. यावेळी सुरु असलेल्या कामाचा पाटबंधारे विभागाचे अधिकारी व संबंधित ठेकेदाराकडून माहिती जाणून घेत आढावा घेतला यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले की, कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील मंजूर,चास नळी, हंडेवाडी, धामोरी, मायगाव देवी, कारवाडी, वेळापूर, बक्तरपूर आदी गावातील शेती आणि शेतकऱ्यांसाठी महत्वपूर्ण असलेला मंजूर बंधारा तीन वेळेस वाहून गेल्यामुळे मंजूर बंधाऱ्याच्या लाभधारक क्षेत्रातील शेतकरी हवालदिल झाले होते. त्यामुळे मागील काही वर्षापासून



बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती व्हावी अशी शेतकऱ्यांची मागणी होती. शेतकऱ्यांना पडलेल्या चिंता पाहून २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी बंधाऱ्याची दुरुस्तीसाठी निधी देण्याचा दिलेला शब्द पूर्ण केला आहे. अशा मोठ्या कामांसाठी पुन्हा पुन्हा शासनाकडून निधी मिळेल याची शाश्वती नाही. मंजूर बंधारा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असून माझ्याप्रमाणे शेतकऱ्यांचे देखील सुरु असलेल्या कामावर बारीक लक्ष आहे. त्यासाठी सुरु असलेले काम वेळेत तर झालेच पाहिजे त्याचबरोबर हे काम उच्च दर्जाचे देखील होणे तेवढेच गरजेचे आहे. जेणेकरून कायमस्वरूपी या बंधाऱ्यात पाणी साठविले जाईल व कितीही मोठा पूर आला तरी मंजूर बंधारा अभेद्य राहील याची काम करतांना काळजी घ्या अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी कार्यकारी अभियंता ग.प्र. हारदे, सहाय्यक अभियंता स.ना. देशमुख, कॉन्ट्रॅक्टर श्री. यादव आदींसह कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी व मंजूर,चास नळी, हंडेवाडी, धामोरी, मायगाव देवी, कारवाडी, वेळापूर, बक्तरपूर आदी गावातील शेतकरी उपस्थित होते.

> मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचा खर्च जरी मोठा असला तरी मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे आव्हान स्वीकारले होते. दिलेला शब्द पूर्ण करायचाच या उद्देशातून मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी किती आणि कसा पाठपुरावा केला हे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांनी कोपरगाव येथील जाहीर सभेत सांगितले आहे. त्यांच्या सहकार्यातून मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी महायुती शासनाकडून तब्बल ४१ कोटी रुपये मंजूर करून आणले आहेत.
>
> **– आ. आशुतोष काळे**

## अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावे : विवेकभैय्या कोल्हे

**● कोपरगाव । वीरभूमी–** विधानसभा मतदारसंघात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विजेचे खांब आणि झाडे कोसळल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला असून, अनेक घरांची पत्रे उडाली आहेत. कांदा, गहू आदी पिकांचेही मोठे नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. सुदैवाने या नैसर्गिक आपत्तीत जीवितहानी झाली नाही, परंतु नागरिकांचे आणि शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



या पार्श्वभूमीवर सहकार महर्षी कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी प्रशासनाकडे तातडीची मागणी केली आहे की, सर्व बाधित भागांची तात्काळ पाहणी करून अधिकृत पंचनामे करावेत. शासन स्तरावरून नुकसानग्रस्त नागरिक व शेतकऱ्यांना त्वरेने आर्थिक मदत आणि भरपाई देण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे.

विवेकभैय्या कोल्हे यांनी पुढे सांगितले की, या नैसर्गिक संकटामुळे अनेक कुटुंबांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी, उद्ध्वस्त घरे आणि शेतजमिनींच्या दुरुस्तीच्या कामांना गती देण्यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर उपाययोजना राबवाव्यात. जनतेला आधार देणे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे.

कोपरगाव मतदारसंघातील नागरिक आणि शेतकरी यांना झालेल्या नुकसानाची दखल प्रशासनाने तातडीने घ्यावी. मोठ्या कष्टाने उभी केलेली पिके काढणीला आलेली असताना झालेले नुकसान हे वेदनादायक असते त्यामुळे शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी तातडीने पंचनामे करून अहवाल शासनाला पाठवण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी असेही शेवटी कोल्हे म्हणाले आहेत.

## श्रीरामपुरात गांजा वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई

**● श्रीरामपूर । वीरभूमी–** शहरातील श्री सिद्धिविनायक मंदिरापासून सरस्वती कॉलनी कडे जाणाऱ्या रोडवर भळगट हॉस्पिटल परिसरात अवैध गांजाची वाहतूक करणारे वाहन पोलिसांनी ताब्यात घेतले. वाहनामधून सुमारे चार ते पाच किलो गांजा जप्त करण्यात आला असल्याची प्राथमिक माहिती आहे. शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना गुप्त बातमीदारा मार्फत एका ईरटीका चारचाकी गाडीमधून अवैधपणे गांजाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यांना सिद्धिविनायक मंदिराकडून सरस्वती कॉलनी कडे जाणाऱ्या रोडवर पोलिसांचा सापळा लावून एक वाहन ताब्यात घेतले. सदर वाहनाची तपासणी केली असता वाहनांमधून सुमारे चार ते पाच किलो गांजा अवैधपणे वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी पोलिसांनी एकास ताब्यात घेतले आहे.

## राजूर येथील कावीळ रुग्णांना रोटरी क्लबचा मदतीचा हात

### काविळ रुग्णांसाठी रोटरी क्लबकडून १५ हजार रुपये किंमतीच्या लिव्हर टॉनिकच्या १०० बाटल्या दिल्या

**● अकोले । वीरभूमी–** राजूर येथील कावीळ झालेल्या रुग्णांच्या उपचारासाठी रोटरी क्लब अकोले सेंट्रल च्या वतिने १५ हजार रुपये किंमतीच्या लिव्हर टॉनिकच्या १०० औषधी बाटल्या देत रोटरी क्लबने आपली आपत्तीत लोकांच्या मदतीला जायची परंपरा कायम ठेवली. गटविकास अधिकारी अमर माने व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.शामकांत शेटे यांच्याकडे या बाटल्या सुपूर्त करण्यात आल्या.




राजूर येथे मध्यंतरी काविळीची मोठी साथ आली होती. यामध्ये अनेक नागरिकांना काविळीची बाधा झाली. दुर्दैवाने यात दोन मुलींचे निधन झाले. काविळीच्या आजारात माणसाच्या लिव्हर वर परिणाम होत असतो. साथीची गंभीर परिस्थिती व अनेक रुग्णांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन रोटरी क्लब अकोले सेन्ट्रलच्या वतीने काविळीच्या आजाराने रुग्ण झालेल्या व्यक्तीसाठी औषधोपचार करण्यासाठी १५ हजार रुपये किंमतीची लिव्हर टॉनिक औषधांच्या १०० बाटल्या मदत म्हणून देण्याचा निर्णय रोटरी क्लबने घेतला व त्याची तातडीने कार्यवाहीही केली. यासाठी सर्व सदस्यांनी आपले आर्थिक योगदान दिले. या १०० औषधांच्या बाटल्या गटविकास अधिकारी अमर माने, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शामकांत शेटे यांच्याकडे सुपूर्त करून आपला खारीचा वाटा उचलला.

यावेळी रोटरी क्लब अकोले सेन्ट्रलचे अध्यक्ष प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, सेक्रेटरी अमोल देशमुख, उपाध्यक्ष दिनेश नाईकवाडी, माजी अध्यक्ष सचिन देशमुख, सचिन आवारी, डॉ. रवींद्र डावरे, माजी उपाध्यक्ष डॉ.जयसिंग कानवडे, माजी खजिनदार रोहिदास जाधव, सदस्य प्राचार्य संतोष कचरे, विजय पावसे, हेमंत मोरे, भारत पिंगळे आदीसह आरोग्य विभागाचे डॉ. शेळके, श्री. येलमामे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

अकोले रोटरी क्लब हा नेहमी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व पर्यावरण क्षेत्रात पुढाकार घेऊन कार्यरत असल्याने त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

रोटरी क्लबच्या वतीने अकोले तालुक्यात पंचायत समितीचे गटविकास अधिकारी म्हणून नियुक्त झालेले अमर माने यांचे अकोले तालुक्यात स्वागत करून त्यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तर रोटरी क्लबचे सदस्य हेमंत मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त गट विकास अधिकारी अमर माने आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ.शामकांत शेटे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## महावितरण कोपरगाव ग्रामीण उपविभागाची विक्रमी वीजबील वसुली

**● कोपरगाव । वीरभूमी–** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.कोपरगाव ग्रामीण उपविभागाने या वर्षामध्ये विजग्राहकांना उत्कृष्ठ व दर्जेदार अविरत सेवा देत वापरलेल्या विजबिलाची विक्रमी वसुली केली आहे. समर्पित भावनेने काम करणारे जनमित्र, बाह्य स्त्रोत कर्मचारी त्यांना पाठबळ व वेळोवेळी मार्गदर्शन करणारे वरिष्ठ अधिकारी त्यांना तितकीच मोलाची साथ देणारे सर्व शाखा अभियंता व बिलिंग विभाग या सर्वांच्या समन्वयातून केलेल्या कार्यामुळे कोपरगाव ग्रामीण उपविभागाने मार्च महिन्यात सर्व विक्रम मोडत विक्रमी वीजबिल वसुली करत वरिष्ठ कार्यालयाने दिलेले वसुलीचे उद्दिष्ट साध्य केले आहे. कर्मचाऱ्यांनी केलेल्या अतुलनीय कार्याबद्दल नुकताच आयोजित गुणगौरव सोहळा पार पडला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महावितरण कोपरगाव उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता लक्ष्मणजी राठोड हे होते, तर प्रमुख अतिथी किरण जाधव प्रादेशिक सचिव SEA संघटनेचे कोकण प्रदेश हे होते, सदर कार्यक्रमास अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.



यावेळी सुजित देशमुख(सहाय्यक अभियंता नाशिक), तुषार घोडगे (संचालक आर. जे. इलेक्ट्रिकल्स), मनीष फुगे (संचालक साई मनीष संगमनेर अभियंता) यांनी आवर्जून सर्वांचे कौतुक केले.

यावेळी उपकार्यकारी अभियंता बोलतांना म्हणाले, आपण वीज ग्राहकांना दर्जदार व तत्पर सेवा द्यावी. जेव्हा आपण वीज ग्राहकाना दर्जेदर व तत्पर सेवा देत असतो, तेव्हा वीज ग्राहकाना सुध्दा वीज बील भरण्यासाठी प्रोत्साहन मिळत असते. सर्वांचे अभिनंदन करत उपकार्यकारी अभियंता यांनी ग्रामीणच्या सर्व कक्ष अभियंता, जनमित्र, बाह्य स्त्रोत कर्मचारी यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सर्वांचा गुणगौरव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तर प्रत्यक्ष केलेल्या कार्याबद्दल जनमित्रांमधून धनंजय बद्रे, सिताराम खंडागळे, अमर आव्हाड, विष्णू परसया यांनी मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक अभियंता हर्षद बावा यांनी केले, तर आभार कनिष्ठ अभियंता अमोल बोडखे यांनी मानले. कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला.

यावेळी महावितरण कोपरगाव ग्रामीण उपविभागातील शाखा अभियंता किशोर घुमरे, रविंद्र काकड, योगेश सोनवणे, राहुल भालेराव, तेजेस बनकर, प्रशांत बोंडखळ, अनिकेत निर्भवणे तसेच सहाय्यक लेखापाल अल्खेश वानखेडे यांच्यासह महिला सहाय्यक अभियंता रंजन करसाळे, कनिष्ठ अभियंता अंकिता भालेराव, मयुरी पवार यंत्रचालक, कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी, जनमित्र, बाह्य स्त्रोत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोपरगाव शहराच्या बेट भागासाठी अर्बन हेल्थ वेलनेस सेंटर मंजूर : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी–** राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या माध्यमातून कोपरगाव शहरासाठी यापूर्वी ३ अर्बन हेल्थ वेलनेस सेंटर मंजूर करण्यात आले आहेत. यामध्ये अजून एका अर्बन हेल्थ वेलनेस सेंटरची भर पडली असून कोपरगाव शहराच्या भेट भागासाठी महायुती शासनाच्या प्रस्तावास मान्यता देवून अजून एक अर्बन हेल्थ वेलनेस सेंटर मंजूर करण्यात आले आहे अशी माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.

कोपरगाव शहरासाठी आरोग्य केंद्र मिळावे यासाठी आ.आशुतोष काळे यांनी राज्य शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाला केंद्र शासनाने मान्यता देवून कोपरगाव शहरासाठी ३ अर्बन हेल्थ वेलनेस सेंटर मंजूर करण्यात आले आहेत.कोपरगाव शहराची वाढती लोकसंख्या व शहरालागत असणाऱ्या उपनगरातील लोकसंख्येचा विचार करून शहरातील नागरिकांप्रमाणे उपनगरातील नागरिकांना देखील आरोग्य व्यवस्था मिळावी यासाठी आ. आशुतोष काळे यांनी महायुती शासनाकडे प्रस्ताव सादर करून त्याबाबत त्यांचा पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्याची दखल घेवून महायुती शासनाच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता देवून अजून एक अर्बन हेल्थ वेलनेस सेंटर मंजूर करण्यात आले असून या अर्बन हेल्थ वेलनेस सेंटरचा फायदा कोपरगाव शहराच्या भेट भागातील नागरीकांना होणार आहे

कोपरगाव मतदार संघाच्या विकासाबरोबरच मतदार संघातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राहावे यासाठी आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहरातील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळवून २८.८४ कोटी निधी मिळविला असून १०० बेडच्या उपजिल्हा रुग्णालयाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. ग्रामीण भागात संवत्सर प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाची मंजुरी मिळवून, माहेगाव देशमुख येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारले आहे. तिळवणी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजुरी व मढी बु. येथे नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांस मंजुरी मिळवत १.३० कोटी निधी मंजूर करून आणला आहे.